महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय,पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे “अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र” असे नामकरण करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: मफुवि-१४२६/प्र.क्र.४९/७-अे**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय विस्तार,मुंबई ४०० ०३२
**दिनांक : १३/०५/२०२६**

वाचा:-

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.मफुकृ-२०२०/प्र.क्र.६६/७-अे, दि.०२.१२.२०२०.
२) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.मफुवि-१४२३/प्र.क्र.११५/७-अे, दि.०९.०८.२०२४.
३) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.मफुवि-१४२३/प्र.क्र.११५/७-अे, दि.०३.१०.२०२४.
४) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेची १२२ वी बैठक, दि.०२.०३.२०२६.
५) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र. मकृप/संशोधन/ १२२ बैठक/७२७/२०२६, दि.१३.०३.२०२६.

प्रस्तावना :-

महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय,पुणे येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, येथे “देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र” उभारण्यास संदर्भ क्र.०१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

देशी गायीचे शास्त्रीयदृष्ट्या संवर्धन, सुधारणा व संशोधन करणे आवश्यक असल्याने, कृषि महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या बळकटीकरणास संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे “अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र” असे नामकरण करण्यास महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेने १२२ व्या बैठकीत मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी संदर्भ ०५ अन्वये शासनास सादर केला होता.

त्यानुषंगाने कृषि महाविद्यालय,पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे “अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र” असे नामकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :-

महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय,पुणे येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, येथे कार्यरत असलेल्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे **"अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र"** असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर नामकरणाबाबतची पुढील कार्यवाही, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी तात्काळ करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०५१३११३८२१२५०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATIBHA
MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.05.13 11:43:33 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,लोकभवन,मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
५. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
६. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
७. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष,विधानसभा,विधानभवन,मुंबई.
८. मा.सभापती/उपसभापती,विधानपरिषद,विधानभवन,मुंबई.
९. मा.विरोधी पक्षनेता,विधानपरिषद/विधानसभा,विधानभवन, मुंबई.
१०. सर्व मा.विधानपरिषद/मा.विधानसभा सदस्य.
११. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई.
१२. सचिव (कृषि),कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
१३. महासंचालक,महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे.
१४. कुलगुरु,महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
१५. कुलसचिव,महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
१६. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा), मुंबई /नागपूर.
१७. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर.
१८. निवडनस्ती ७-अे.